डॉ. बाबासाहेब आंबेडकर

आणि

इस्लाम

लेखक

आर. एस. विद्यार्थी

भाषांतर

मुबारक हुसैन मनियार

भूमिका

या पुस्तिकेत भारतीय शोषित, दलित समाजाच्या समस्येचे समाधान प्रस्तुत करण्यासाठी एक सशक्त, साहसी, यथार्थवादी व अत्यंत व्यावहारिक दृष्टिकोन स्वीकारला गेला आहे. लेखक माननीय श्री. आर. एस. विद्यार्थी यांचे सन १९६१ ते १९८१ पर्यंत बौद्ध धर्माशी संबंध राहिलेले आहेत. त्यांनी जवळजवळ सलग दहा वर्षांपर्यंत भारतीय बौद्ध महासभा, दिल्ली प्रदेशाची कार्यकारिणी, त्याच्या शाखांचे संयोजक, महासचिव आणि केवळ अध्यक्षपदच सुशोभित केले असे नव्हे, तर त्यांनी या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणीला साकार रूपदेखील प्रदान केले. ही पुस्तिकादेखील बाबासाहेबद्वारा निरूपित आणि निर्धारित उद्देश प्राप्त करण्यात निश्चितरूपे साहाय्यक सिद्ध होईल, अशी आम्ही आशा बाळगतो.

आपण कोठे जात आहात याला इतके महत्त्व नाही जितके या गोष्टीला आहे की, आपण तेथे का जात आहात? बाबासाहेबांनी सन १९३५ मध्ये ''आम्ही हिंदू राहता कामा नये. मी हिंदू धर्मात जन्मलो ही बाब माझ्या हातातील नव्हती. परंतु हिंदू म्हणून न मरणे माझ्या हातची गोष्ट आहे.'' असे सांगून त्यांनी धर्मांतराची घोषणा केली. परंतु धर्मपरिवर्तन का करावे, ही गोष्ट आपल्या अनुयायांना समजावून देणे बाबासाहेबांना फार आवश्यक वाटते, म्हणून त्यांनी ३१ मे इ. सन १९३६ रोजी मुंबईत महार दलित परिषद बोलविली, ज्यामध्ये त्यांनी धर्मांतर का करावयाचे आहे, यासंबंधी विस्तारपूर्वक सांगितले. बाबासाहेबांनी या सभेत आपले लिखित भाषण मराठीमध्ये दिले होते. आदरणीय विमल कीर्ति यांनी त्याचे हिंदीमध्ये भाषांतर करून ते प्रकाशित करून बाबासाहेबांचे विचार हिंदी भाषिकांना जाणून घेण्यात मदत करून मोठे उपकार केले आहेत.

बाबासाहेबद्वारा लिखित व आदरणीय विमल कीर्ति द्वारा अनुवादित 'दलित वर्ग को धर्मांतर की आवश्यकता क्यों है?' या सन १९७८ मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकाला आधारपभूत मानून ही पुस्तिका लिहिली गेली आहे. म्हणून यामध्ये जेथे जेथे पृष्ठ क्रमांक दिलेले आहेत ते सदर पुस्तकाचे होत. आम्हाला पूर्ण अशा आहे की, सदर पुस्तिका आकाराने छोटी असूनदेखील दलितवर्गाच्या ज्वलंत मूळ प्रश्नांचे समाधान प्रस्तुत करून त्यांचे अचूक व कायमस्वरूपी मार्गदर्शन करील.

-प्रकाशक

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे."

मूलत: पशू आणि मनुष्य या दोहोंमध्ये हाच विशेष फरक आहे की, पशू आपल्या विकासाचा विचार करु शकत नाही, परंतु मनुष्य मात्र विचार करू शकतो आणि आपला विकास घडवून आणू शकतो.

हिंदू धर्माने दलितवर्गाला पशूपेक्षा अधिक वाईट स्थितीत पोचविले आहे. याच कारणास्तव तो आपल्या परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी पूर्णपणे प्रयत्न करू शकत नाही. पशूप्रमाणे तर तो चांगल्या चाऱ्याच्या शोधाला लागला आहे. परंतु आपली मानसिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी आपल्या उद्देशांना तो गांभीर्याने घेत नाही.

दलितांची वास्तविक समस्या कोणती?

परंपरागत उच्चवर्णियांद्वारा निरपराध दलितांवर निर्ममतेने केल्या जाणाऱ्या अत्याचारांना कसा पायबंद घालावा, हीच दलितांची मूळ समस्या आहे.

हजारो वर्षांपासून दलितवर्गावर अत्याचार होत आलेले आहेत. आजसुद्धा निरंतर होत आहेत. या अत्याचारांचा क्रम कसा सुरू झाला आणि आजदेखील या अत्याचारांना का आळा बसला नाही? हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे.

इतिहास साक्षी आहे की, या देशाचे मूळ रहिवाशी द्रविड जातीचे लोक होते, जे अत्यंत सभ्य व शांतिप्रिय होते. आजपासून जवळजवळ पाच किंवा सहा हजार वर्षांपूर्वी आर्य लोक भारतात आले आणि येथील मूळ रहिवाशी द्रविडांवर हल्ले चढविले. फलस्वरूप आर्य आणि द्रविड या दोन संस्कृतीमध्ये भीषण युद्ध झाले. आर्य लोक फार चालाक होते. म्हणून फसवणूक, कपट आणि फुटीरपणाची पद्धत अवलंबून द्रविडांना पराभूत करून ते या देशाचे स्वामी बनले.

या युद्धांत द्रविडांनी घेतलेल्या भूमिकेच्या दृष्टीने द्रविडांचे विभाजन दोन वर्गांत करता येईल. प्रथम वर्गात ते द्रविड येतात ज्यांनी या युद्धांत शेवटपर्यंत आर्यांशी लढा दिला आणि त्यांचा पराभव केला. त्यांना आर्य लोक फार भीत असत. दुसऱ्या वर्गात ते द्रविड मोडतात जे सुरूवातीपासून युद्धांत तटस्थ राहिले अथवा युद्धांत भाग घेतल्यानंतर थोड्याच वेळात अलिप्त झाले, अर्थात लढले नाहीत.

आर्यांनी विजय प्राप्त केल्यानंतर युद्धांत भाग घेतलेल्या व भाग न घेतलेल्या

अशा दोन्ही वर्गांना शूद्र घोषित करून टाकले आणि आर्यांची सेवा करणे त्यांचे कर्तव्य ठरवून दिले. केवळ इतका फरक केला की, ज्या द्रविडांनी युद्धात भाग घेतला नव्हता त्यांना स्पृश्य शूद्र घोषित करून त्यांना शांतिपूर्वक राहू दिले. कोळी, माळी, पिंजारी, कोष्टी, पाणके, मांग वगैरे या वर्गात मोडतात. परंतु ज्या द्रविडांनी या युद्धांत हिरीरीने भाग घेतला आणि आपले शौर्य गाजविले, त्या लढवय्यांना अस्पृश्य शूद्र घोषित केले आणि त्यांना अशा प्रकारे तुडविले की, ते लोक हजारो वर्षांपर्यंत डोळे वर काढू शकले नाहीत. त्यांचे उद्योगधंदे बंद केले आणि त्यांना गावाबाहेर वस्ती करण्यास भाग पाडले आणि त्यांना इतके लाचार करून टाकले की, त्यांना जिवंत राहण्यासाठी मेलेल्या जनावरांचे मांस खाणे भाग पडले. जाटव, भंगी, चांभार, महार, खाटीक वगैरे याच वर्गातील लोक होत.

परंतु या योद्धावर्गातील लोकांपैकी एक मोठा वर्ग असा निघाला ज्याने निश्चय केला की, बरे आम्ही युद्धांत हरलो, परंतु आम्ही आर्यांची गुलामगिरी स्वीकारणार नाही. ते लोक जंगलात निघून गेले आणि तेथेच बसले. नाग, भिल्ल, संथाल, जरायु मागासलेल्या वन्य जाती या वर्गात येतात. ते आजसुद्धा आर्यांच्या कोणत्याही सरकारचा मन:पूर्वक स्वीकार करीत नाहीत आणि आजदेखील ते स्वतंत्रपणे जंगलात राहणे अधिक पसंत करतात.

आर्य संस्कृतीचेच दुसरे नाव हिंदू धर्म अथवा हिंदू समाज आहे. हल्ली हिंदू तर शांतीची गोष्ट करतात. परंतु हजारो वर्षांपूर्वी झालेल्या आर्य-द्रविड युद्धात धोकेबाजीने पराभूत केलेल्या द्रविड संस्कृतीचे प्रतीक महाराजा रावणाचा प्रत्येक वर्षी पुतळा दहन करून द्वेषभावनेचे प्रदर्शन करतात. आजसुद्धा ते शूद्रांना आपला शत्रू आणि गुलाम मानून त्यांना जिवंत जाळतात, त्यांची सर्रास कत्तल करतात, त्यांच्यावर तऱ्हेतऱ्हेचे अवर्णनीय घृणास्पद अत्याचार करतात. सध्या घडलेल्या अत्याचारांची ताजी उदाहरणे खालीलप्रमाणे होत.

मंदिरात जल अर्पण करण्याच्या आरोपात हरिजनांना गोळीने उडविले

मध्य प्रदेशातील शिवपुरी जिल्ह्यातील खेरावाली गावात शिव मंदिरात जल अर्पण करण्यास जाणाऱ्या तीन हरिजनांना दिवसाढवळ्या गोळी घालून ठार करण्यात आले. इतर तिघे जखमी झाले त्यापैकी एक हरिजन नव्हता. ही माहिती मध्य प्रदेशचे माजी स्वायत्त राज्यमंत्री व अखिल भारतीय काँग्रेस कमिटी (इं.) चे सभासद श्री. राजाराम सिंह यांनी दिली. त्यांनी सांगितले की, गोळी तर डाकूंनी मारली. परंतु त्यांना गावच्या ठाकुरांनी बोलाविले होते. घटनेचे वर्णन करताना श्री. राजाराम सिंह यांनी सांगितले की, ठाकूरांनी हरिजनांना अगोदरच धमकी दिली होती की, त्यांना शिव मंदिरात जल अर्पण करू दिले जाणार नाही. हरिजनांनी या धमकीचा लिखिन रिपोर्ट पोलीस ठाण्यात दिला. पोलिसांनी कलम १०७ अन्वये घटनेची नोंद तर केली. परंतु कोणतेही परिणामकारक पाऊल उचलले नाही. श्री. सिंह यांच्या कथनानुसार, २८ जुलै रोजी जेव्हा हरिजन मथुरा जिल्ह्यातील सोरोघाटहून कावडीने पाणी घेऊन गावी आले आणि शिव मंदिराकडे जाऊ लागले, तेव्हा तेथे अगोदरच हजर असलेल्या डाकूंच्या एका टोळीने त्यांच्यावर गोळीबार केला. या घटनेत तीन हरिजन ठार झाले आणि अनेकजण जखमी झाले. ही घटना दिवसा ३ ते ४ वा.च्या दरम्यान घडली. या घटनेनंतर डाकू लुटालूट न करता निघून गेले. अद्याप कोणासही अटक झालेली नाही. (दै.'हिंदुस्तान' दि. ८-८-१९८१)

हरिजनाला झाडावर टांगून ठार केले !

कोईम्बतूरपासून २० किलोमीटर अंतरावरील मानपल्ली गावात सवर्ण जमीनदारांनी २० वर्षे वयाच्या हरिजन तरुणाला नारळाच्या झाडावर टांगले. अनेक तास लोंबकळत राहिल्यानंतर तो तरुण मेला. पोलिसांच्या कथनानुसार, त्या तरुणाबरोबर दोन स्त्रियांनादेखील नारळाच्या झाडावर टांगले होते. परंतु तरुणाच्या मृत्यूनंतर त्यांना सोडले गेले. असे म्हणतात की, जमीनदार मोटारसायकलवरून गावातून कोठेतरी बाहेर जात होते. रस्त्यात त्यांना दोन हरिजन तरुण व दोन तरुणी दिसल्या. त्या जमीनदारांना वाट देण्यावरून त्यांच्यावर भांडण जुंपले. एक हरिजन तरुण पळून गेला. उरलेल्या तीन तरुणतरुणींना नारळाच्या झाडाशी बांधण्यात आले. त्यात युवक मरण पावला. (सांध्य टाइम्स, दि. ११-८-१९८१)

याशिवाय दररोजच अत्याचाराच्या बातम्या वर्तमानपत्रात येत असतात. बलछी, पफलटा, दिहुली, साढूपुर वगैरे गावात झालेले रक्तपात विसरणे शक्य नाही.

देशात एखादा क्षणदेखील असा जात नसेल जेव्हा दलितवर्गावर अत्याचार होत नसेल, कारण वर्तमानपत्रांत तर केवळ ठळक बातम्याच छापल्या जातात. ''हे अत्याचार म्हणजे एका समाजावर दुसऱ्या समर्थ समाजाकडून होत असलेले अन्याय आणि अत्याचारांचा प्रश्न आहे. एका व्यक्तीवर होत असलेल्या अन्याय अथवा अत्याचाराचा हा प्रश्न नव्हे, तर एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गावर मुद्दाम केले जाणारे अतिक्रमण आणि जुलूम, शोषण आणि त्रासाचा हा प्रश्न आहे.'' (पृष्ठ - ८)

अशा प्रकारे ही एक निरंतर चालत आलेल्या वर्गकलहाची समस्या आहे.

हे अत्याचार कोण करतो? का करतो? आणि कशासाठी करतो? अत्याचारी अत्याचार करण्यात का यशस्वी होत आहेत? या अत्याचारांना पायबंद बसू शकेल काय? अत्याचारांना आळा घालण्याचा खरा आणि परिणामकारक उपाय, साधन अथवा मार्ग कोणता असू शकेल? हे काही असे प्रश्न आहेत ज्यात दलितवर्गाला आज गंभीरतेने पुन्हा विचार केला पाहिजे.

दलितवर्गावर हिंदू धर्माचे तथाकथित सवर्ण हिंदू अत्याचार करतात आणि ते अत्याचार अशासाठी करीत नाहीत की दलित लोकांनी त्यांचे काही वाईट केले आहे, तर दलितांवर अत्याचार करणे हा आपला अधिकार आहे असे ते मानतात आणि अशाप्रकारचा अधिकार त्यांना त्यांचे धर्मग्रंथदेखील देतात.

सवर्ण आपली पारंपरिक श्रेष्ठता कायम राखण्यासाठी अत्याचार करतात. जेव्हा दलितवर्ग परंपरागत उच्चवर्ग (हिंदू) बरोबर व्यवहार करताना बरोबरीच्या, समानतेच्या संबंधाने व्यवहार करण्याचा आग्रह धरतो, तेव्हा हा वर्गकलह उत्पन्न होतो. कारण उच्चवर्ग नीचवर्गाच्या अशा तऱ्हेच्या व्यवहाराला आपला अपमान मानतो. अशा तऱ्हेने सवर्ण आपली परंपरागत श्रेष्ठता कायम टिकविण्यासाठी अत्याचार करतो. सवर्ण आणि दलितवर्गादरम्यान हा रोजचाच वर्गकलह आहे.

कोणत्या प्रकारे या वर्गकलहापासून स्वत:चा बचाव करता येईल याचा विचार करणे अत्यावश्यक आहे. या वर्गकलहापासून आपले संरक्षण कसे होईल, या प्रश्नाचा निर्णय लावणे मला वाटते माझ्यासाठी काही अशक्य बाब नव्हे. येथे जमा झालेल्या आपणा सर्व लोकांना एकच गोष्ट मान्य करावी लागेल की, कोणत्याही कलहात, संघर्षात ज्याच्या मनगटात सामर्थ्य असते, त्याच्याच गळ्यात विजयमाला पडते. ज्यांच्या ठायी सामर्थ्य नसते, त्यांनी विजयाची अपेक्षा बाळगणे व्यर्थ आहे. याच्या समर्थनार्थ अन्य आधार शोधणे व्यर्थ आहे. म्हणून तमाम दलितवर्गाने आपल्या हाती सामर्थ्य आणि शक्ति एकवटली पाहिजे. (पृष्ठ ९-१०)

सामर्थ्य अर्थात शक्ती म्हणजे काय?

मनुष्य समाजाजवळ तीन प्रकारच्या शक्ती असतात. एक मनुष्यबळ, दुसरी धनबळ आणि तिसरी मनोबळ. या तिन्हींपैकी तुमच्याजवळ कोणती शक्ती आहे? मनुष्यबळाच्या दृष्टीने तुम्ही केवळ अल्पसंख्यकच नव्हे तर संघटितसुद्धा नाही. तुम्ही नुसते संघटित नाही, एवढेच नव्हे तर तुम्ही एकत्रसुद्धा राहात नाही. दलित लोक गाव आणि खेड्यांत विखुरलेले आहेत, म्हणून जे मनुष्यबळ आहे त्याचासुद्धा अत्याचारग्रस्त आणि जुलमाने पिडलेल्या अस्पृश्यवर्गाच्या वस्त्यांना काडीचादेखील उपयोग होऊ शकत नाही.

धनबळाच्या दृष्टीने पाहिले तर तुमच्याजवळ थोडेसे मनुष्यबळ तर आहे, परंतु धनबळ नावालासुद्धा नाही. सरकारी आकडेवारीप्रमाणे देशाच्या एकूण जनसंख्येपैकी ५५ टक्के जनसंख्या आजसुद्धा दारिद्र्यरेषेच्या खालील जीवन जगत आहे, ज्यामध्ये ९० टक्के लोक दलितवर्गातील आहेत.

मानसिक बळाची तर त्यापेक्षाही दुर्दशा आहे. शेकडो वर्षांपासून हिंदूंकडून होत असलेले जुलूम, अपमान व तिरस्कार सहन करीत आल्यामुळे प्रतिकारशक्ती पूर्णत: नष्ट झाली आहे. तुम्हा लोकांचा आत्मविश्वास, उत्साह व महत्त्वाकांक्षी असणे या भावना समूळ नष्ट करण्यात आल्या आहेत. आम्हीसुद्धा काही करू शकतो, असली भावना कुणाच्या मनात येत नाही. (पृष्ठ १०-१२)

जर माणसाजवळ मनुष्यबळ आणि धनबळ हे दोन्ही असतील आणि मनोबळ नसेल, तर हे दोन्ही निष्फळ ठरतात. समजा तुमच्याजवळ पुष्कळ पैसा आहे आणि लोकदेखील खूप आहेत. तुमच्याजवळ बंदुका आणि इतर संरक्षण सामुग्रीदेखील उपलब्ध आहे. परंतु तुमच्याजवळ मनोबळ नसेल तर आलेला शत्रू तुमच्या बंदुका आणि संरक्षण सामग्रीसुद्धा हिरावून घेईल. म्हणून मनोबळ असणे अत्यंत आवश्यक आहे. मनोबळाचे जगप्रसिद्ध उदाहरण तुमच्यासमोर आहे. ऐतिहासिक घटना आहे, काही कपोलकल्पित नव्हे. नेपोलियन एक अत्यंत साहसी आणि अजिंक्य सेनापती म्हणून प्रसिद्ध होता. त्याच्या केवळ नावानेच शत्रूचा थरकाप होत असे. परंतु त्याला एका सामान्य सैनिकाने युद्धात धूळ चारली होती. विशेष उल्लेखनीय गोष्ट अशी की, या सैनिकाने त्याला असे सांगून हरविले की, मी नेपोलियनला अवश्य पराभूत करीन. कारण मी त्याला खेळाच्या मैदानावर हरविले आहे आणि खरोखरच त्याने नेपोलियनला हरविले. त्या सैनिकाने महान शक्तिशाली अजय म्हणविणाऱ्या

नेपोलियनला हरविले. कारण त्याचे मनोबळ खेळाच्या मैदानापासूनच नेपोलियनविषयी वाढलेले होते.

मनोबळाचे एक वैशिष्ट्य असे की, जेव्हा ते एखाद्याविरुद्ध वाढते तेव्हा ते कमी होणे अशक्य असते. म्हणूनच तर नेपोलियनजवळ वस्तुत: भौतिक शक्ती आणि युद्धकौशल्य असूनदेखील त्या उलट प्रचंड मनोबल असलेल्या एका सामान्य सैनिकाने त्याला आव्हान देऊन पराभूत केले. म्हणून तर दलितवर्गाला असे वाटत असेल की, आम्ही आपल्या शक्तीच्या बळावर अत्याचारांना तोंड देऊ तर ही त्यांची चूक आहे. याशिवाय आम्हाला ही गोष्ट कदापि विसरून चालणार नाही की, हिंदूंचे मनोबल आमच्याविरुद्ध अगोदरच खूप वाढलेले आहे. आम्ही कितीही वास्तविक शक्ती मिळविली तरी ते असाच विचार करणार की शेवटी हे चांभार, भंगी (अथवा अस्पृश्य) आहेत, हे काय करू शकतात? म्हणून आम्ही मनोबल वाढविणे आवश्यक आहे आणि हे त्याच वेळी शक्य आहे जेव्हा आम्ही एखाद्या बाहेरील शक्तीचे साहाय्य घेऊ जिचे मनोबल ढासळलेले नाही, उलट वाढलेले असावे.

दलितांवरच अत्याचार का होतात?

मी वास्तविक स्थितीचे जे हे विश्लेषण केले आहे, जर ही वस्तुस्थिती आहे तर यातून जो सिद्धान्त निघेल तो तुम्हा सर्व लोकांना मान्य करावा लागेल आणि तो असा की तुम्ही आपल्या स्वत:च्या सामर्थ्यावर अवलंबून राहाल तर तुम्हाला या अत्याचाराचा विरोध करणे शक्य नाही. तुम्ही लोक सामर्थ्यहीन असल्यामुळेच तुमच्यावर स्पृश्य हिंदूकडून अतिरेक, जुलूम आणि अन्याय होतात. यात मला तिळमात्र शंका नाही. (पृष्ठ - १२)

तुमच्याप्रमाणेच येथे मुस्लिमसुद्धा अल्पसंख्य आहेत. एखाद्या गावात मुस्लिमांची दोन घरे असल्यास एखादा स्पृश्य हिंदू त्यांच्याकडे डोळे वटारून पाहू शकत नाही. तुम्हा लोकांचे (दलित-अस्पृश्य) दहा घरे असूनदेखील स्पृश्य हिंदू अत्याचार, अन्याय आणि जुलूम करतात. तुमच्या वस्त्या जाळल्या जातात. तुमच्या स्त्रियांवर बलात्कार होतो. पुरुष, मुले आणि स्त्रियांना जिवंत जाळण्यात येते. तुमच्या स्त्रिया, सुना आणि तरुण मुलींना नग्न करून गावभर फिरविले जाते, हे सर्व का घडते? हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. यावर तुम्ही लोकांनी गांभीर्याने विचार केला पाहिजे व शोध घेतला पाहिजे. माझ्या दृष्टीने या प्रश्नाचे एकच उत्तर दिले जाऊ शकते आणि ते असे आहे की, त्या दोन मुस्लिमांच्या पाठीशी भारताच्या संपूर्ण मुस्लिम समाजाची

शक्ती आणि सामर्थ्य आहे. ही गोष्ट हिंदू समाजाला चांगल्या प्रकारे माहीत असल्यामुळे त्या दोन घरांच्या मुस्लिमांकडे वाईट हेतूने बोट दाखविले तर पंजाबपासून मद्रासपर्यंत आणि गुजरातपासून बंगालपर्यंतचा संपूर्ण मुस्लिम समाज आपली शक्ती खर्च करून त्यांचे संरक्षण करील. हा विश्वास स्पृश्य हिंदू समाजाला असल्यामुळे त्या दोन घरांचे मुस्लिम निर्भय होऊन आपले जीवन व्यतीत करतात. परंतु तुम्हा दलित अस्पृश्यासंबंधी स्पृश्य हिंदू समाजाचा असा समज झाला आहे आणि खरोखर हे सत्य आहे की, तुम्हाला कोणी मदत करणार नाही. तुमच्यासाठी कोणीही धावून येणार नाही. तुम्हाला आर्थिक मदत होणार नाही आणि एखाद्या सरकारी अधिकाऱ्याचीदेखील मदत होणार नाही. पोलीस, कोर्ट आणि कचेऱ्यांमध्ये त्यांचेच लोक असल्यामुळे स्पृश्य हिंदू आणि दलितांच्या संघर्षात ते जातीकडे पाहतात, आपल्या कर्तव्याकडे त्यांचे लक्ष नसते. प्रथम जात आणि नंतर काहीही जातवाल्यांनासुद्धा पूर्ण विश्वास असतो की, कोणीही आमचे काही वाकडे करू शकत नाही. तुम्हा लोकांच्या या असहाय स्थितीमुळेच तुमच्यावर स्पृश्य हिंदू समाज अत्याचार जुलूम आणि अन्याय करतो. (पृष्ठ १२-१३)

येथपावेतो मी जे विश्लेषण केले आहे त्यापासून दोन गोष्टी सिद्ध होतात. पहिली गोष्ट अशी आहे की, विनासामर्थ्य तुम्ही जुलूम आणि अन्यायाचा प्रतिकार करू शकणार नाही. दुसरी गोष्ट अशी की, प्रतिकारासाठी अत्यावश्यक असलेले सामर्थ्य आज तुमच्याकडे नाही. या दोन्ही गोष्टी सिद्ध झाल्यानंतर तिसरी एक गोष्ट आपोआप स्पष्ट होते की, हे आवश्यक सामर्थ्य तुम्हा लोकांना कोठून तरी बाहेरून मिळविले पाहिजे. हे सामर्थ्य तुम्ही कसे मिळवू शकाल? हाच खरोखर महत्त्वाचा प्रश्न आहे आणि त्याचे निर्विकल्प दृष्टीने चिंतन आणि मनन केले पाहिजे. (पृष्ठ १४)

बाह्य शक्ती कशी प्राप्त करावी?

ज्या गावात अस्पृश्यांवर स्पृश्य हिंदूकडून जुलूम होतो, त्या गावात अन्य धर्माचे लोक नसतात असे नाही. अस्पृश्यांवर होणार जुलूम त्यांच्या निरपराधीपणाबद्दल आहे, निष्पाप लोकांवर अत्याचार आहे, ही गोष्ट त्यांना (अन्य धर्मियांना) माहीत नाही, अशातली गोष्ट नाही. जे काही चालले आहे ते वास्तविकत: जुलूम आणि अन्याय आहे हे माहीत असूनदेखील ते लोक अस्पृश्यांच्या मदतीला धावून जात नाहीत, त्याचे अखेर कारण तरी काय आहे? ''तुम्ही आम्हाला का मदत करीत नाही?'' जर तुम्ही त्यांना असा प्रश्न विचारला तर ''तुमच्या भांडणात आम्ही

का पडावे? जर तुम्ही आमच्या धर्माचे असता तर आम्ही आपणास सहकार्य केले असते,'' अशा प्रकारचे उत्तर ते तुम्हाला देतील. यावरून ही गोष्ट तुमच्या लक्षात येऊ शकते की, जोपर्यंत तुम्ही कोणत्याही अन्य समाजाचे उपकार मानणारे होत नाही, तोपर्यंत कोणत्याही अन्य धर्माची दीक्षा घेतल्याविना तुम्हाला बाह्य सामर्थ्य प्राप्त होऊ शकत नाही. याचाच स्पष्ट अर्थ असा आहे की, तुम्हा लोकांना धर्मांतर करून अन्य कोणत्याही समाजात समाविष्ट झाले पाहिजे. याशिवाय तुम्हाला त्या समाजाचे सामर्थ्य प्राप्त होणे शक्य नाही आणि जोपर्यंत तुमच्या पाठीशी सामर्थ्य नाही तोपर्यंत तुम्हाला आणि तुमच्या भावी पिढीला आजच्याप्रमाणे भयंकर, अमानवी, मनुष्यताहीन दरिद्री अवस्थेत संपूर्ण जीवन कंठावे लागेल. अत्याचार निर्दयता सहन करावी लागेल, यात काही शंका नाही. (पृष्ठ १४-१५)

बाबासाहेबांच्या या विचारावरून ही गोष्ट आपोआपच स्पष्ट होते की, सामर्थ्य प्राप्त करण्यासाठी आम्हाला कोणत्याही इतर समाजाचे उपकार मानणारे बनावे लागेल, कोणत्याही अन्य समाजात सामील व्हावे लागेल. दलितवर्गीय लोक जे असे समजतात की, आपल्या संगठन आणि बाहुबळानेच आपल्या समस्या त्यांना सोडविणे शक्य आहे ते स्वत: केवळ फसवणूक आणि धोक्यात आहेत, असे नव्हे तर ते दलित समाजालासुद्धा चुकीचा मार्ग दाखवित आहेत. असा मार्ग जो बाबासाहेबांच्या विचारांच्या अगदी विरुद्ध आहे.

हिंदू धर्मात तुमच्यासाठी अजिबात सहानुभूती नाही

हिंदू धर्म आणि समाजाकडे तर सहानुभूतीच्या इच्छेने पाहिले तर सर्वच व्यर्थ, चोहीकडे अंधार दिसेल. सर्वत्र घृणा, द्वेष, अहंकार, अज्ञान आणि अंधकार दिसेल, असेच म्हणावे लागेल. या गोष्टीचा तुम्हाला चांगलाच अनुभव आहे. हिंदू धर्मात तर आपुलकीची भावना अजिबात नाही, उलट हिंदू समाजाकडून तुम्हाला कट्टर शत्रू, गुलामापेक्षा नीच आणि जनावरापेक्षा हीन समजले जाते. (पृष्ठ १९)

हिंदू समाजात तुमच्यासाठी समतेची दृष्टी आहे का?

काही हिंदू अस्पृश्यांना म्हणतात की, तुम्ही शिक्षण घ्या, स्वच्छ राहा जेणेकरून आम्ही तुम्हाला स्पर्श करू शकू, समानतेने पाहू, परंतु प्रत्यक्षत: पाहिले तर अज्ञानी, दरिद्री आणि अस्वच्छ दलितांची जी दुर्दशा होत आहे तशीच दुर्दशा सुशिक्षित धनवार आणि स्वच्छ राहणाऱ्या आणि सुविचारी दलितांचीसुद्धा होते.

दलितवर्गाच्या समृद्धीसाठी प्रयत्नशील तत्कालीन उपपंतप्रधान जगजीवन राम यांनी वाराणसी येथे संपूर्णानंद यांच्या पुतळ्याचे अनावरण केले, तेव्हा ज्या प्रकारे त्यांना अपमानित व्हावे लागले त्याने दलितांचे डोळे खाडकन उघडले आहेत की, हिंदूचे स्वच्छतेच्या आधारावर समानतेच्या व्यवहाराचे आश्वासन किती मोठी फसवणूक आहे. ही गोष्ट स्मरणात ठेवण्याजोगी आहे की, जगजीवनरामद्वारा अनावरण झालेल्या पुतळ्याला गंगेच्या पाण्याने धुवून पवित्र करण्यात आले. काहीजण आपल्या आर्थिक मागासलेपणालाच आपल्यावर होणाऱ्या अत्याचारांचे कारण मानतात. हे खरे आहे की, गरिबी अनेक दु:खांचे कारण असते. पण गरीब तर ब्राह्मण, वैश्य आणि क्षत्रियसुद्धा आहेत. गरिबीमुळे ते लोकदेखील त्रासलेले आहेत आणि ते दारिद्र्याविरुद्ध लढतदेखील आहेत. परंतु आम्हाला एकाच वेळी दोन युद्धे लढावी लागत आहेत. एक तर दारिद्र्याचे आणि दुसरे घृणायुक्त जातीप्रथेविरुद्ध. एकीकडे आम्हावर गरिबीचा मारा होत आहे आणि दुसरीकडे आम्ही एका विशिष्ट जातीचे असल्यामुळे मार खात आहोत.

हिंदू धर्मात स्वातंत्र्य

कायद्याने तुम्हाला हवे तितके अधिकार आणि हक्क दिलेले असोत. परंतु समाज त्यांचा उपयोग करू देईल तेव्हाच हे हक्क होत. या दृष्टीने पाहिले तर तुम्हाला मंदिरात जाण्याचे स्वातंत्र्य नाही आणि जिवंत राहण्याचेदेखील स्वातंत्र्य नाही, हे तुम्हाला चांगल्या प्रकारे माहीत आहे. याच्या समर्थनात अधिक पुरावे गोळा करण्याची गरज नाही. जर स्वातंत्र्याच्या दृष्टीने पाहिले तर आम्हाला दिसेल की, आम्ही एखाद्या गुलामापेक्षाही वाईट स्थितीत आहोत. स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्व ज्या माणसाच्या विकासासाठी आवश्यक बाबी मानल्या गेल्या आहेत तुमच्यासाठी हिंदू धर्मात त्यापैकी कोणतीही उपलब्ध नाही.

हिंदू धर्म आमच्या पूर्वजांचा धर्म होता का?

हिंदू धर्म आमच्या पूर्वजांचा धर्म असणे शक्य नाही, तर बळजबरीने त्यांच्यावर लादलेली गुलामगिरी होती. आमच्या पूर्वजांना या धर्मात बांधून ठेवणे हा एक क्रूर खुनी पंजा होता, ज्याला आमच्या पूर्वजांच्या रक्ताची तहान होती. या गुलामगिरीतून मुक्ती प्राप्त करण्याची क्षमता आणि साधन उपलब्ध नव्हते, म्हणून यांना या गुलामगिरीविरुद्ध बंड पुकारणे शक्य नव्हते. त्यांना याच गुलामगिरीत राहावे लागले. याबद्दल आम्ही त्यांना दोषी ठरवणार नाही, तर कोणीही त्यांच्यावर दयाच करील.

परंतु आजच्या पिढीवर तशा प्रकारची बळजबरी करणे कोणासही शक्य नाही. आम्हाला सर्व प्रकारचे स्वातंत्र्य आहे. या स्वातंत्र्याचा योग्य प्रकारे उपयोग करून जर या पिढीने आपल्या मुक्तीचा मार्ग शोधला नाही, की जी हजारो वर्षांपासून ब्राह्मणी अर्थात हिंदू धर्माची गुलामगिरी आहे, ती झुगारून दिली नाही, तर मी असेच समजेन की, त्यांच्यासारखे नीच, त्यांच्यासारखे हरामी आणि त्यांच्यासारखे भ्याड, जे स्वाभिमान विकून जनावरापेक्षाही हीन दर्जाचे जीवन जगतात, इतर कोणीही नाही. ही गोष्ट मला अत्यंत दु:खाने आणि निर्दयतेने सांगावी लागेल. (पृष्ठ ३८-३९)

धर्म उद्देशपूर्तीचे साधन आहे म्हणून धर्मपरिवर्तन करा

जर तुम्हाला माणुसकीशी प्रेम असेल तर धर्मांतर करा. हिंदू धर्माचा त्याग करा. तमाम दलित अस्पृश्यांच्या शेकडो वर्षापासून गुलाम ठेवल्या गेलेल्या वर्गाच्या मुक्तीसाठी ऐक्य, संगठन करावयाचे असेल तर धर्मांतर करा. समानता प्राप्त करावयाची असेल तर धर्मांतर करा. स्वातंत्र्य प्राप्त करावयाचे असेल तर धर्मांतर करा. आपल्या जीवनाचे साफल्य हवे असेल तर धर्मांतर करा. मानवी सौख्य हवे असेल तर धर्मांतर करा. हिंदू धर्म सोडण्यातच सर्व दलित, पददलित, अस्पृश्य, शोषित, पीडितवर्गाचे खरे हित आहे. असे माझे स्पष्ट मत बनलेले आहे. (पृष्ठ ५९)

धर्मपरिवर्तनाचा उद्देश

अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराचा मुख्य उद्देश स्पष्टपणे बाह्य शक्ती संपादन करण्यासाठी निश्चित केला होता. ही गोष्ट आम्ही कधीही विसरता कामा नये. कारण बाह्य शक्ती प्राप्त केल्यानेच दलितवर्गावर होणाऱ्या अत्याचारांना पायबंद घालणे शक्य होईल, अपमानजनक जीवनापासून मुक्ती मिळू शकेल आणि आम्हाला मिळेल स्वतंत्र जीवन, सन्मानपूर्ण जीवन, माणुसकीचे जीवन. बाहेरील शक्ती प्राप्त करावयाची आहे, या निश्चयाला क्रियान्वित करण्यासाठी बाबासाहेबांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या लाखो अनुयायांसमवेत बौद्ध धर्म स्वीकारला होता.

बाबासाहेबांनी बौद्ध धर्मच का स्वीकारला?

कोणत्याही विद्वानाला आणि विशेषत: वकिलाला आपल्या कोणत्याही बाबतीत यशस्वी होण्यासाठी त्याला आपले लक्ष्य विसरता कामा नये. सर्वात उत्तम मार्ग तोच असतो, ज्याचा अवलंबकरून आपल्या उद्देशापर्यंत पोचता येईल. कोणत्याही रमणीय सुंदर मार्गाला चांगले म्हणणे शक्य नाही, जर ते उद्देशापर्यंत पोचवत नसेल. बाबासाहेब एक महान विद्वानच नव्हे तर उच्चकोटीचे बॅरिस्टरसुद्धा होते. म्हणून सन १९५६ मध्ये जेव्हा त्यांनी धर्मपरिवर्तन करण्याचा विचार केला, तेव्हा धर्मपरिवर्तनासाठी अगोदरच निश्चित केलेले बाह्य शक्ती प्राप्त करणे, अर्थात कोणत्याही दुसऱ्या समाजाची शक्ती प्राप्त करण्याचे लक्ष्य डोळ्यांसमोर ठेवले होते. त्याप्रमाणे त्यांनी विचार करावयास प्रारंभ केला की, हिंदू समाजाव्यतिरिक्त कोणत्या समाजाची शक्ती या देशात आहे की, जी प्राप्त करून दलितवर्गाचे लोक अत्याचारापासून वाचू शकतील आणि सन्मानपूर्व आयुष्य जगू शकतील. त्यांना आढळले की, या देशात ख्रिश्चन समाजाची शक्ती नाही, न बौद्ध समाजाची आणि इस्लामी समाजाचीदेखील शक्ती नाही. सन १९४७ च्या देश विभाजनानंतर इतरांप्रमाणेच मुस्लिमांचीसुद्धा शक्ती देशात नगण्य राहिली. अर्थात आमच्या देशात एखाद्या अन्य समाजाची अशी शक्ती नव्हती की, जी प्राप्त करून अत्याचारापासून मुक्ती मिळाली असती. अशी कल्पना करा की, एका खोलीच्या मधोमध एक जर्जर शक्तीहीन रोगी खाली जमिनीवर पडण्याच्या बेतात आहे आणि त्या खोलीत एकही खांब नाही की ज्याचा त्याने आधार घ्यावा. अशा स्थितीत तो रोगी काय करणार? तो आधार घेण्यासाठी खोलीच्या एखाद्या भिंतीकडे अनायास सरसावेल. अगदी त्याचप्रमाणे बाबासाहेबांनीसुद्धा जेव्हा पाहिले की, खोलीरूपी या देशात कोणतेही आश्रय नाही तेव्हा त्यांना आपल्या क्षीण समाजाला पडण्यापासून वाचविण्यासाठी भिंतीकडे धाव घ्यावी लागली. अर्थात जेव्हा त्यांनी पाहिले की, या देशात कोणताही असला समाज नाही की, ज्याच्या शक्तीत विलीन होऊन दलितवर्गाला यातना आणि अत्याचारापासून वाचविता येईल. तेव्हा त्यांनी आपल्या देशाजवळच्या देशाकडे दृष्टी वळविली की, त्यात एखादा समाज राहतो का, की ज्याची शक्ती प्राप्त करून उद्देश पूर्ण करता येईल. त्यांना आढळले की, चीन, जपान, श्रीलंका, ब्रह्मदेश, थायलंड वगैरे देशांत बौद्ध धर्मावलंबी समाज आहे. म्हणून त्यांची शक्ती अर्थात 'बाह्य शक्ती' प्राप्त करण्यासाठी बौद्ध धर्म स्वीकारावे आणि त्यांनी तसेच केले. त्या वेळी एखाद्या अन्य धर्माचा अवलंब करून उद्देशपूर्तीमध्ये अडचण भासली असती आणि बौद्ध धर्म

स्वीकारून उद्देशपूर्ती सोपी वाटत होती. म्हणून बाबासाहेबांनी बौद्ध धर्म स्वीकारला होता. यात लेशमात्रदेखील शंकेला वाव नाही.

पाकिस्तान झाल्यानंतर सन १९५६ मध्ये जेव्हा बाबासाहेबांनी धर्मपरिवर्तन केले होते, तेव्हा भारतात मुस्लिमांची शक्ती नव्हतीच. त्याशिवाय त्या वेळी हिंदूच्या मनात मुस्लिम अथवा इस्लामच्या नावाने इतकी घृणा होती की, जर त्या वेळी आम्ही मुस्लिम झालो असतो, तर आम्हाला गावोगावी गाजर-मुळ्याप्रमाणे कापून फेकून दिले असते. म्हणून जर बाबासाहेबांनी १९५६ मध्ये इस्लाम धर्म स्वीकारला असता तर ही त्यांची एक फार मोठी कसोटी ठरली असती. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन त्यांनी उद्देशाच्या प्राप्तीसाठी बौद्ध धर्म स्वीकारून भविष्यकाळात बुद्धीचा उपयोग करण्याचा संकेत देऊन दलितवर्गाच्या मुक्तीचा खरा मार्ग मोकळा करून एक महान कार्य केले होते. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितवर्गाला बौद्ध धर्मरूपी हे परम औषध देऊन केवळ एक महिना २२ दिवस लोटले होते की, ६ डिसेंबर सन १९५६ ला ते परलोकवासी झाले. कशा प्रकारे बाबासाहेब हे पाहूच शकले नाहीत की त्यांनी आपल्या या लोकांना की जे महान व्याधीने पिडले होते त्यांना जे रामबाण औषध दिले होते ते त्यांना लागू तरी पडले काय अथवा त्याची 'रिॲक्शन' आली म्हणजे ते लागू पडले नाही?

बाबासाहेब आम्हाला मार्गदर्शन करण्यासाठी आमच्यामध्ये जिवंत नाहीत. आता तर या दलितवर्गाला स्वत:च आपल्या कल्याणाचा विचार करावा लागेल. आम्हा सर्वांना एकत्र येऊन विचार करावयास पाहिजे की, जे बौद्ध धर्मरूपी रामबाण औषध आम्ही आजपासून जवळजवळ ३२ (आता ५०) वर्षांपूर्वी घ्यावयास सुरू केले होते, त्याने आमचा रोग किती प्रमाणात बरा केला? बरा तरी केला की नाही? अथवा हे औषध 'रिॲक्शन' तर करीत नाही ना? अर्थात विपरीत परिणाम तर करीत नाही ना? असे मूल्यमापन करण्याची वेळ आज ३२ वर्षांनंतर (आता ५० वर्षांनंतर) देखील आलेली नाही काय? निश्चितपणे आम्ही मूल्यमापन केले पाहिजे.

बौद्ध धर्म स्वीकारून आम्ही आपल्या उद्देशप्राप्तीमध्ये किती यशस्वी झालो? यासंबंधी बाबासाहेबद्वारा निर्धारित कोणताही धर्म स्वीकारण्याचा उद्देश दलितवर्गाला बाह्य शक्ती प्राप्त करून देणे असला पाहिजे. अशा प्रकारे दलितवर्गाने बौद्ध धर्म स्वीकारण्याचा उद्देश बाह्य शक्ती प्राप्त करणे असा होता. म्हणून आम्हाला हे पाहिले पाहिजे की, बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे दलितवर्गाला बाहेरील शक्ती किती मिळाली? काही मिळाली आहे की अजिबात नाही? अथवा या धर्माचा स्वीकार केल्याने

आमची मूळ शक्तीदेखील काही कमी झाली आहे?

असे आढळते की, बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे दलितांमध्ये कोणतीही बाह्य शक्ती आली नाही तर त्यांची मूळ शक्तीदेखील कमी झाली आहे. सर्वप्रथम तर दलितवर्गाने जितक्या मोठ्या संख्येने बौद्ध धर्म स्वीकारणे आवश्यक होते, तितक्या मोठ्या जनसंख्येने स्वीकारले गेले नाही आणि अधिकतर दलित समाज अशिक्षित असल्यामुळे तो स्वीकारला गेला नाही. बौद्ध धर्म म्हणतो की, ईश्वर, अल्लाह वगैरे काहीही नाही. ही गोष्ट अद्याप चांगल्या सुशिक्षितांनादेखील कळत नाही. ते कोणत्या ना कोणत्या स्वरूपात ईशसत्तेला स्वीकारतात तर ही गोष्ट अशिक्षित लोकांच्या लक्षात कशी काय येईल की ईश्वर, अल्लाह वगैरे काही नाही. हेच सर्वांत मोठे कारण आहे की, ज्यामुळे दलितवर्गाच्या मोठ्या संख्येने हा धर्म स्वीकारला नाही. दलितवर्गाच्या एका लहान संख्येने ते स्वीकारले आहे. खरे तर असे आहे की, फक्त चांभार आणि महार जातीच्या एकूण लोकसंख्येपैकी मुष्किलीने २० टक्के दलितांनी बौद्ध धर्म स्वीकारला आहे. त्यांचीही स्थिती अशी आहे की, जे २० टक्के बौद्ध झालेले आहेत ते ८० टक्के चांभारांना म्हणतात की, हे महारचे महारच राहिले आणि ८० टक्के चांभार जे बौद्ध बनले नाहीत ते म्हणतात, हे मूर्ख कोठून बनले आहेत?

अशा प्रकारे पूर्वी जी शंभर चांभारांची शक्ती होती तीदेखील २० आणि ८० टक्क्यांमध्ये वाटून गेली. त्याशिवाय २० आणि ८० ची शक्तीसुद्धा आपापल्या जागी पूर्णपणे टिकून राहिली अशातली गोष्ट उरली नाही, कारण बौद्ध आणि चांभारांमध्ये संघर्षसुद्धा झाले आहेत. अशा तऱ्हेने बौद्ध धर्म स्वीकारल्याने दलितवर्गाच्या शक्तीचा ऱ्हास झाला, वाढली नाही आणि उद्देश तर बाह्य शक्ती प्राप्त झाली आहे काय? अजिबात नाही. फक्त इतके झाले की पूर्वी चांभार होते ते आता स्वत:ला बौद्ध म्हणवू लागले. परंतु काहीही म्हटल्याने ती शक्ती येत नाही. या देशात जुने बौद्ध तर नाहीतच की ज्यांची शक्ती या नवबौद्धांना मिळाली असावी आणि दोघांनी मिळून एक बलवान समाज बनविला असावा. दुसऱ्या बौद्ध देशांनीसुद्धा नवबौद्धांना मदत करण्यात कोणतीही रूचि दाखविली तरी ते कशी करणार? फार झाले तर भारत सरकारला एक विरोधपत्र लिहून पाठवतील की, भारतात बौद्धांवर अत्याचार होणे योग्य नव्हे. त्या विरोधपत्राने काम भागेल का आणि त्याच्या फोटोस्टॅट प्रती काढून बौद्ध त्यांना काठीने झोडपणाऱ्या किंवा जिवंत जाळून टाकणाऱ्यांना दाखवून सुरक्षित राहतील काय? अथवा जेथे त्यांना गोळ्या घालून ठार करण्याची गोष्ट होते, तर त्या दुसऱ्या देशांच्या विरोधपत्रांच्या प्रती दाखवून ते वाचू शकतील काय? अशा तऱ्हेने बाहेरच्या देशांच्या

मदतीने तर या देशात आम्हा असहाय लोकांचे काहीही भले होणार नाही आणि झालेही नाही.

वरील विश्लेषणाने स्पष्ट होते की, आम्ही बौद्ध धर्म स्वीकारून काही प्राप्त करण्याऐवजी काही हरवले आहे, जरी आम्ही ते प्राप्तीसाठी स्वीकारले होते. अशा प्रकारे बौद्ध धर्म दलितवर्गाचे उद्देश पूर्ण करण्यात पूर्णत: विफल ठरले आहे.

असा प्रश्न केला जाऊ शकतो की, डॉ. आंबेडकरांचा विचार चुकीचा होता काय? त्यांच्या डोक्यात या सर्व बाबी आल्या नव्हत्या का? या बाबतीत इतकेच सांगणे पुरेसे आहे की, एकतर कोणत्याही माणसाकडून उणीव राहू शकते. दुसरे असे की, काही प्रश्न असे असतात की ते केवळ विचार केल्याने सुटत नसतात तर त्यांची अंमलबजावणी होते किंवा नाही हे पाहणे अधिक महत्त्वपूर्ण असते. बाबासाहेबांनी जो काही विचार केला होता तो बरोबरच होता. परंतु ज्याच्यावर काही नैतिक जबाबदारी असते आणि ती पुरी केली गेली नाही, तर त्यात विचार करणाऱ्याची चूक मानावी काय? बौद्ध देशांनी आपली जबाबदारी पुरी केली नाही आणि आता त्यांच्या मदतीने काही होणारही नाही, कारण आमची समस्या केवळ राजनैतिक नाही तर सामाजिकसुद्धा आहे आणि ती अधिक कठीण आहे. जर आमच्यासमोर सामाजिक समस्या नसती, तर संभवत: संयुक्त राष्ट्रसंघात बौद्ध देशांचा आधार घेता आला असता आणि आपली राजनैतिक समस्या सोडविणे शक्य झाले असते. परंतु आम्हाला तर प्रथम सामाजिक शक्ती प्राप्त करावयाची आहे, ज्यामुळे अलीकडे होत असलेल्या अत्याचारापासून आपला बचाव करणे शक्य होईल.

या देशात कोट्यवधींच्या संख्येत लक्षावधी वेगवेगळ्या गावात दलित लोक विखुरलेले आहेत. पूर्णपणे निर्दोष असूनदेखील त्यांच्यावर जागोजाग जुलूम आणि अत्याचार होत असतात. या अत्याचारापासून स्वत:चा बचाव कशा प्रकारे करावा ही दलितवर्गाची मूळ समस्या आहे. या महाव्याधीपासून मुक्ती देण्यासाठीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्मरूपी परमौषधी दिली होती, जी लागू पडली नाही, तर उलटाच परिणाम झाला. अर्थात दलित समाज बौद्ध आणि अबौद्ध अशा दोन तंबूत वाटला जाऊन अधिकच निर्बल झाला आहे. तुम्ही विचाराल की, बाबासाहेब याच्याबद्दल दोषी आहेत काय? नाही, तर आमच्या शरीराला हे परम औषध लागूच पडले नाही.

या विश्लेषणावरून इतके तर स्पष्टपणे सिद्ध झाले की, बौद्ध धर्माने आता आमचे भागणार नाही, आता तर या समाजाला धृष्टपुष्ट तगडा बनविण्यासाठी जादा

बाह्य शक्ती प्राप्त करण्यासाठी दुसरेच औषध घ्यावयास हवे.

काही लोक विचारतील की आमच्या रोगीरूपी समाजासाठी बाबासाहेब सिद्धहस्त डॉक्टर बनले का, की जे आम्हाला योग्य औषध देऊ शकले नाहीत? या प्रश्नाचे उत्तर तुम्ही एका सर्वांगरूपाने योग्य अशा उदाहरणाने समजू शकाल. असे म्हटले जाते की, ज्या डॉक्टरांनी पेनिसिलीन नामक परमौषधाचा शोध लावला त्यांनी अशी घोषणा केली होती की, जगात जर अमृत नावाची वस्तू असेल तर ती पेनिसिलीन होय आणि ती आम्ही शोधून काढली आहे. बऱ्याच अंशी ते बरोबरदेखील आहे. कारण ज्याला पेनिसिलीन लागू पडते त्याच्यासाठी हे औषध अमृतच सिद्ध होते. कितीही गंभीर रोगाला हे ठीक करते. परंतु ज्याला लागू पडत नाही अशा रोग्यासाठी ते अमृत (पेनिसिलीन) जीव घेणारे सिद्ध होते.

प्रत्येक डॉक्टरला असेच वाटते की, प्रत्येक रोग्याला मी पेनिसिलीनचे इंजेक्शन द्यावे, परंतु इंजेक्शन देण्यापूर्वी तो एक टेस्ट डोस देतो, जेणेकरून त्याला कळावे की, रोग्याला हे औषध लागू पडते किंवा नाही. जर रोग्याला ते लागू पडत नसेल, तर डॉक्टर त्याला पेनिसिलीन अजिबात देत नाही. त्याचबरोबर अशी सूचनासुद्धा करतो की, कधीही पेनिसिलीनचा उपयोग करू नका, कारण त्याची तुम्हाला रिॲक्शन येते.

बौद्ध धर्मरूपी घेतल्यामुळे दलितवर्गाला रिॲक्शन आली आहे. ही त्याला अधिक निर्बल करीत आहे. बौद्ध धर्मामुळे २० टक्के आणि ८० टक्के अशा तऱ्हेने विभाजित होऊन दलितवर्गाची मूळ शक्तीसुद्धा कमी होत चालली आहे. आमची दशा अशी झाली आहे जणू एखाद्या मोठ्या डॉक्टरकडे एका गंभीर रोगाने पछाडलेला रोगी आला आणि तो डॉक्टर त्याची तपासणी करून आपल्या शिष्यांना सांगून कोठेतरी निघून गेला की याला पेनिसिलीनचे इंजेक्शन द्या जे सर्वोत्तम आहे. त्याचे शिष्य त्या रोग्याला पेनिसिलीनचे इंजेक्शन देतात. परंतु त्या इंजेक्शनामुळे रोग्याला रिॲक्शन येते, म्हणजे लागू पडत नाही. त्यामुळे रोग्याची स्थिती अधिकच बिघडत जाते आणि मोठ्या डॉक्टरचे ते भंपक आणि अनुभव नसलेले शिष्य अद्याप सांगताहेत की, आमच्या मोठ्या डॉक्टरांनी पेनिसिलीनच द्यावयास सांगितले होते, म्हणून पेनिसिलीन द्या. कोणतीही समंजस व्यक्ती त्यांना बुद्धिमान म्हणेल का, की हे फार चांगले पक्के चेले आहेत, की जे आपले गुरू अर्थात आपल्या मोठ्या डॉक्टरांच्या म्हणण्यावर अडून बसले आहेत का त्यांना उलट मूर्ख व अज्ञानी म्हणेल?

अशीच स्थिती आमची आहे. बौद्ध धर्म आम्हावर रिॲक्शन करीत आहे की,

जी परमौषधी समजून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आम्हाला देऊन फक्त एक महिना २२ दिवसानंतरच परलोकवासी झाले होते, ती आम्हाला लागू पडत नाही. कारण बौद्ध धर्म स्वीकारण्याचा उद्देश बाहेरील शक्ती प्राप्त करणे होते. परंतु बाह्य शक्ती प्राप्त करणे तर लांबचीच गोष्ट आहे. तो धर्म तर आमची मूळ शक्तीसुद्धा कमी करीत आहे. हे आम्हाला चांगले समजले आहे अथवा समजून घेतले पाहिजे. जर आजदेखील आम्ही बौद्ध धर्म स्वीकारण्याचाच हट्ट धरला अथवा आग्रह केला तर प्रत्येक समंजस व्यक्ती आमच्या निर्बुद्धपणाची कीव करील. ती व्यक्ती हसेल आणि शत्रू आनंद मानील आणि असेच घडत आहे. आज जेव्हा आमच्या काही जागरूक मित्रांनी दुसरे औषध म्हणून इस्लाम धर्माकडे लक्ष देण्यास सुरूवात केली आहे. तेव्हा आमचे अज्ञानी मित्र याचा विरोध करीत आहेत आणि म्हणत आहेत की, बाबासाहेबांनी दाखविलेले औषधच घ्यावयाचे आहे आणि आमचा शत्रूदेखील असाच सल्ला देत आहे की बौद्ध धर्मच स्वीकारा. मुस्लिम बनू नका कारण त्यांना जाणीव आहे की यांच्या बौद्ध धर्म स्वीकारण्याने यांचे काही कल्याण होणार नाही आणि मला काहीही नुकसान होणार नाही. बाबासाहेबांचे अनुयायी म्हणविणाऱ्यांना ही गोष्ट चांगल्या प्रकारे समजून घेतली पाहिजे आणि जर बाबासाहेबांच्या अनुयायांमध्ये थोडादेखील समजुतदारपणा असेल तर त्यांनी समजून घेतले पाहिजे की बाबासाहेबांनी ठरविलेल्या धर्मांतराचा उद्देश बाह्य शक्ती प्राप्त करणे होय. हे चांगल्या प्रकारे समजून घेतले पाहिजे की बाह्य शक्तीचा अर्थ विदेशी शक्ती नव्हे, तर भारतात विद्यमान असलेल्या दुसऱ्या समाजाची शक्ती होय जी प्राप्त करण्यासाठी आम्हाला पुरेपूर प्रयत्न केले पाहिजे. त्यासाठीच आम्हाला धर्मपरिवर्तन करावयाचे आहे.

आता बाबासाहेबांच्या अनुयायांचे कर्तव्य ठरते की, बौद्ध धर्मरूपी परमौषधी घेतल्याने जे विकार आणि उपद्रव आमच्या समाजात उत्पन्न झालेले आहेत, सर्वप्रथम ते शांत केले पाहिजेत आणि या बौद्ध धर्मरूपी परमौषधीच्या जागी एखादा अन्य धर्म स्वीकारावा जेणेकरून आम्ही आमच्या धर्मांतराचा उद्देश प्राप्त करून अत्याचारापासून मुक्ती प्राप्त करावी.

बाबासाहेब प्रयत्नशील होते की, माझ्या दलित पीडित बांधवांना हिंदूच्या जुलूम आणि अत्याचारांपासून मुक्ती मिळाली पाहिजे. त्यांचा या गोष्टीवर अजिबात विश्वास नव्हता की, या रोगीरूपी दलितवर्गाला विशिष्ट औषध अर्थात बौद्ध धर्मच दिला पाहिजे, मग गुण येवो की न येवो. म्हणून एकदा तर त्यांनी असे सांगितले की, ''जर मी आपल्या अस्पृश्य बांधवांना अत्याचारापासून मुक्त केले नाही तर मी

स्वत:ला गोळी घालून आत्महत्या करीन.'' अशी होती त्यांची भीष्मप्रतिज्ञा. अशा प्रकारे हे स्पष्ट झाले की, जर आज बाबासाहेब जिवंत असते तर निश्चितपणे त्यांनी बौद्ध धर्म सोडून एखादा अन्य धर्म स्वीकारावयास सांगितले असते. परंतु बाबासाहेब आमच्यामध्ये नाहीत. म्हणूनच तर आज आम्हाला त्यांनी निश्चित केलेल्या उद्देशांच्या प्राप्तीसाठी, स्वत:ला अत्याचारापासून मुक्त करण्यासाठी बौद्ध धर्माचा त्याग करून एखाद्या अन्य धर्माचा स्वीकार केला पाहिजे.

स्वत: बाबासाहेबांनी आपल्याच जीवनकाळात आपल्याच अनेक मान्यतांना फाटा दिला होता. याचे काही उदाहरणे खालीलप्रमाणे होत. -

१. जातीय समझोत्याने मिळालेल्या दोन मतांच्या हक्काला, की ज्याला बाबासाहेब फारच आवश्यक मानत होते, त्यांनी स्वत: एकमतामध्ये बदलण्यास स्वीकृती दिली होती.

२. बाबासाहेब गांधीजींना अस्पृश्यांचा कट्टर विरोधी व शत्रू मानत असत. परंतु असेदेखील दाखले आहेत की, बाबासाहेबांनी गांधीजींनी मुक्तकंठाने महिमा गायिली आहे. त्यांच्याच शब्दात पाहा. ''मला वाटते की या साऱ्या प्रकरणांत (पुणे करार घडविण्यात) हा मार्ग काढण्याचे फार मोठे श्रेय स्वत: महात्मा गांधींना आहे. मी गांधीजींचे उपकार मानतो की, त्यांनी मला एका बिकट स्थितीतून बाहेर काढले आहे. मला केवळ या गोष्टीबद्दल खेद वाटतो की, महात्मा गांधींनी गोलमेज परिषदमध्येदेखील असाच पवित्रा का घेतला नाही. जर त्यांनी माझ्या दृष्टिकोनाशी असाच औदार्यपूर्ण व्यवहार केला असता तर त्यांना या संकटातून जावे लागले नसते. असो या सर्व भूतकाळातील गोष्टी होत. मला आनंद होत आहे की, आज मी येथे या ठरावाचे समर्थन करण्यासाठी हजर आहे. मला विश्वास आहे की, जे अन्य मित्र हजर नाहीत, मी त्यांच्यावतीनेदेखील सांगतो की आम्ही या ठरावाचे पालन करू. याविषयी कोणाच्याही मनात शंका राहू नये. मला आशा आहे की हिंदू लोक या समझोत्याला एक पवित्र समझोता मानतील आणि याचे पालन करताना स्वत:च्या इभ्रतीला काळीमा फासू देणार नाहीत.''
(डॉ. आंबेडकरांची भाषणे - पहिला भाग, १९७८ च्या आवृत्तीचे पृष्ठ ३३ वरून - संपादक : ॲड. भगवानदास)

३. जर हिंदूंनी दलितवर्गाला समानतेचा दर्जा दिला असता तर बाबासाहेबांचा मुळात हिंदू धर्मामध्येच राहण्याचा विचार होता. त्यांच्याच शब्दांत पाहा,

''जर मंदिरप्रवेश अस्पृश्यांसाठी उन्नतीचे पहिले पाऊल असले तर मी त्याचे समर्थन अशासाठी करेन की, त्यांना असाच धर्म हवा आहे, ज्यात त्यांना सामाजिक समता प्राप्त व्हावी. अस्पृश्य लोक असला धर्म सहन करणार नाहीत, ज्यामध्ये सामाजिक विषमता आणि भेदभाव सुरक्षित असतील.'' (पृष्ठ १२२, 'बाबासाहेबांचा जीवनसंघर्ष', लेखक जिज्ञासु) हा विचार नंतर त्यांनी बदलला आणि धर्मांतराची घोषणा करून टाकली. 'पुणे करारा'च्या वेळी भाषण करताना ते म्हणाले होते की, ''राजनैतिक करारापेक्षा पुढे जाऊन आपण असे काही करावे जेणेकरून दलितवर्गाला हिंदू समाजाचा एक भाग म्हणून राहणे शक्य होईल आणि त्याला समाजात सन्मान आणि समानतेचा दर्जा प्राप्त होईल.'' (डॉ. आंबेडकरांची भाषणे - पृष्ठ ३५)

४. बाबासाहेब बहुतेक काँग्रेसचे विरोधकच राहिले, परंतु त्याचे कट्टर समर्थक म्हणूनदेखील समोर आले. त्यांच्याच शब्दांत,

''तुम्हाला काँग्रेसबद्दलच्या तुमच्या दृष्टिकोनात एकदम बदल केला पाहिजे. आजतागायत काँग्रेसबद्दल आमचा दृष्टिकोन एका विरोधकाचा दृष्टिकोन राहिला आहे. राजनैतिक क्षेत्रांत आम्ही एकदुसऱ्याचे शत्रू राहिलो आहोत. अजूनपर्यंत आमचा दृष्टिकोन संकुचित राहिला आहे. आम्हाला केवळ आमच्या जातीच्या स्वार्थांचीच चिंता राहिली आहे. आता आम्ही जेव्हा स्वातंत्र्य प्राप्त केलेले आहे, तेव्हा आम्हाला आपल्या दृष्टिकोनात मुळापासून बदल घडवून आणला पाहिजे.''
(डॉ. आंबेडकरांची भाषणे, पृष्ठ - ६६)

''मला लोक विचारतात की, गेले पंचवीस वर्षे काँग्रेसच्या विरुद्ध लढा देत राहिलो असतानादेखील मी त्या विशिष्ट वेळी का मौन धारण केले? नेहमीच लढत राहणे म्हणजे सर्वश्रेष्ठ युद्धकौशल्य नव्हे, आम्हाला दुसऱ्या पद्धतीचासुद्धा उपयोग केला पाहिजे.'' (डॉ. आंबेडकरांची भाषणे, पृष्ठ - ६८)

अशा प्रकारे आम्ही पाहतो की, बाबासाहेबांनी आपल्याच जीवनकाळात आपली तत्त्वे बदलून टाकली. या गोष्टीच्या समर्थनात पूर्वी वर्णन केलेली काही उदाहरणे अगदी खास बाबींशी संबंधित आहेत, ज्यांच्याशी दलितवर्गाच्या जीवनमरणाचा प्रश्न निगडित होता. या शिवाय जेथे बाबासाहेबांनी दलितांच्या हितासाठी आपली काही तत्त्वे बदलली, तेथे काही तत्त्वांची पूर्तादेखील झाली नाही. त्यांनी सांगितले होते,

''ज्या समाजात १० बॅरिस्टर, २० डॉक्टर आणि ३० इंजिनियर असतील, अशा समाजाला मी धनवान समाज मानतो, जरी त्या समाजाची प्रत्येक व्यक्ती शिक्षित नाही. उदाहरणार्थ चांभार, हल्ली या समाजाला तिरस्काराच्या दृष्टीने पाहतात. जर याच समाजात काही वकील, डॉक्टर आणि सुशिक्षित लोक असतील तर या समाजाकडे वाकड्या दृष्टीने पाहण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही, जरी त्या समाजात प्रत्येक व्यक्ती शिकलेली नाही.''

परंतु यात बाबासाहेबांचा किंचितही काही दोष नाही. जर आपण आपल्या मुलापासून खूप आशा बाळगत असाल आणि आपला मुलगा त्या पूर्ण करीत नाही, तर त्यात आपला दोष कोणता? नाही तरी आपला मुलगा जबाबदारी न समजण्याचा दोषी आहे. अगदी अशाच प्रकारे बाबासाहेबांच्या मान्य गोष्टी चुकीच्या सिद्ध झाल्या, तर त्यात बाबासाहेबांचा दोष नाही, तर त्यांच्या अनुयायांच्या उणिवा आहेत की ज्यामुळे त्यांनी आपली जबाबदारी पुरी केली नाही जी त्यांनी करणे भाग होते.

धर्म मानवासाठी आहे

बाबासाहेबांनी सांगितले आहे,

''मी आपणास हे स्पष्टपणे सांगू इच्छितो की, मनुष्य धर्मासाठी नाही तर धर्म माणसासाठी आहे. जगात माणसापेक्षा कोणतीही गोष्ट श्रेष्ठ नाही. धर्म केवळ एक साधन आहे जो बदलता येऊ शकतो, फेकून दिला जाऊ शकतो.'' (पृष्ठ ५९)

आम्ही हे पाहिलेच की बौद्ध धर्माचा स्वीकार ज्या उद्देशासाठी केला होता, त्यात तो सपशेल निष्फळ ठरला आहे. म्हणून असा प्रश्न उद्भवतो की, कोणता धर्म आता स्वीकारावा. यासाठी आम्ही हे पाहिले पाहिजे की, बाबासाहेब बौद्ध धर्माव्यतिरिक्त कोणकोणत्या धर्मांना चांगले आणि योग्य मानत होते. त्यांनी इस्लाम आणि ख्रिश्चन धर्माची खूप प्रशंसा केली आहे आणि म्हटले आहे की, माणसाची माणुसकीच सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. ही माणुसकी इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मांच्या मुळाशी आहे. ही माणुसकी सर्वांत वंदनीय असावयास पाहिजे. कोणीही कुणाचा अपमान करता कामा नये आणि कुणालाही असमान मानता कामा नये. हे शिक्षण ते (इस्लाम आणि ख्रिश्चन) धर्म देत आहेत.

अशा प्रकारे आमच्यासमोर आता दोन धर्म उरले आहे, ज्यांची वरील शब्दांतच नव्हे तर अन्य अनेक ठिकाणी बाबासाहेबांनी अंत:करणापासून प्रशंसा केली आहे.

इस्लाम धर्म स्वीकारावा की ख्रिश्चन मत?

यावर विचार करण्यापूर्वी आम्हाला आपल्या मूळ समस्येची आठवण केली पाहिजे, कारण चांगला विचारवंत तोच असू शकतो जो आपल्या मूळ प्रश्नापासून ढळत नाही, त्याचे चांगले स्मरण ठेवतो. एकदा जर रोगाचे निदान झाले की रुग्णावर उपचार करण्यात अडचण येत नसते.

तसे पाहिले तर आमच्यासमोर अनेक समस्या आहेत, आर्थिक आणि शैक्षणिकसुद्धा आहेत. परंतु या समस्या इतरांच्यादेखील आहेत, अगदी सवर्णांच्यासुद्धा. भाकरी तर तेव्हाच मिळेल जेव्हा आम्ही काबाडकष्ट करू, शिक्षणाचा प्रश्न तेव्हाच सुटेल जेव्हा आम्ही आपल्या मुलांना शिकवावयाचे ठरवू, नाहीतर शिक्षणाच्या सर्व सोयी असूनदेखील आजसुद्धा असे अनेक चेतनाशून्य महाभाग आहेत जे आपल्या मुलांना बूटपॉलिश करण्यासाठी पाठवितात, जेणेकरून ते रात्री दहा रूपये कमाई करून आणतील. सांगण्याचे तात्पर्य एवढेच की, आम्हाला आमच्या मूळ प्रश्नाकडे लक्ष दिले पाहिजे.

कोट्यवधींच्या संख्येत दलित लोक लक्षावधी गावात विखुरलेले आहेत, ज्यांना काहीही दोष नसतानादेखील नियमाने मारले-तोडले जाते आणि अपमानित केले जाते. हे वेगवेगळ्या प्रकारचे जुलूम, अत्याचार आणि रोजच्या अपमानाला कसा पायबंद बसेल आणि कशा प्रकारे समानतेच्या आधारावर जीवन जगता येईल, हा मूळ प्रश्न आहे.

जरी समस्येला योग्य रूपांत पाहणे महत्त्वाचे असले तरी काही स्वार्थी मंडळी ज्यांच्यात आमचे काही अज्ञानी बंधू गुंतलेले असू शकतील, जे आम्हाला आमच्या मूळ प्रश्नापासून व त्याच्या सोडवणुकीपासून दूर दुसरीकडे नेऊ इच्छितात, जेथे आम्ही व्यर्थ भटकत राहावे आणि आपल्या उद्देशाप्रत पोचू नये.

आम्हाला आमच्या मूळ प्रश्नाच्या सोडवणुकीचा शोध घेताना हे पाहिले पाहिजे की, लक्षावधी गावांत दररोज आमच्यावर तऱ्हेतऱ्हेचे अत्याचार कोठे ना कोठे होतच असतात. म्हणून आम्हाला त्याच लक्षावधी गावांतील मदत करणारे गावकरी पाहिजेत. आम्हाला रुपये-पैशांची मदत करणारा नको, तर आम्हाला क्रूरतेने निर्दोष आणि आमची कत्तल करणाऱ्याचे हात धरणाऱ्या मदतनीसाची-मार्शलची गरज आहे, जेणेकरून सर्वप्रथम अत्याचाऱ्यांपासून आमच्या जीवाचे रक्षण होईल.

भारतातील फारच थोड्या गावांत ख्रिश्चन लोक आहेत आणि त्यांच्यात

तितके सामर्थ्य नाही की, ते आमचे रक्षण करू शकतील. परंतु मुस्लिम मात्र देशाच्या सत्तर टक्के गावांत आहेत आणि ते स्वरक्षण करू शकतात. ते मार्शल आहेत. ते आपल्या समाजावर, आपल्या धर्मबंधुंवर होणारा अत्याचार कधीच सहन करणे शक्य नाही. अशा प्रकारे जर आम्ही इस्लाम धर्म स्वीकारला तर निश्चितपणे आमची मूळ समस्या सुटेल.

बाबासाहेबांनी स्वत: म्हटले होते की, मी माझ्या लोकांना सर्वोत्तम धर्म देऊ इच्छितो. परंतु काळाने हे स्पष्ट दाखवून दिले आहे की, बाबासाहेबांनी जे सर्वोत्तम बौद्ध धर्मरूपी औषध दिले ते आम्हाला लागू पडले नाही. म्हणून त्या औषधाचा विकल्प घेणे म्हणजे बाबासाहेबांच्या आज्ञेचे उल्लंघन नाही, तर त्यांनी ठरवून दिलेल्या उद्दिष्टांची प्राप्ती होय.

इस्लाम मध्यममार्ग होय

आपण या गोष्टीशी सहमत व्हाल की, धर्म अधिक चांगले जीवन जगण्याची कला आहे. याची जगात आम्हाला तीन रूपे आढळतात. घोर ईश्वरवादी, घोर नास्तिक आणि बुद्धिपरक ईश्वरवादी. घोर ईश्वरवादी लोक माणसाला काही महत्त्वच देत नाहीत. घोर नास्तिक लोक केवळ माणसालाच सर्वकाही मानतात. हे दोन्ही अतिरेकी मार्ग आहेत. आम्हीसुद्धा यापैकीच एका बौद्ध धर्माची निवड केली होती. परंतु एका तिसरा मध्यममार्ग इस्लाम धर्माचा आहे, जो ईश्वरावरही विश्वास ठेवतो आणि माणसालाही महत्त्व देतो. तो म्हणतो की, साऱ्या जगाप्रमाणेच अल्लाहने मानवाचीदेखील निर्मिती केलेली आहे. परंतु अल्लाहने मानवाला स्वातंत्र्य दिले आहे, त्याने आपल्या इच्छेनुसार बरेवाईट कर्म करावेत आणि अशा प्रकारे आपल्या कर्मांना मनुष्य स्वत:च जबाबदार आहे, अल्लाह नव्हे. अल्लाह असे म्हणत नाही की, निर्बलांवर अत्याचार करा, त्यांचे शोषण करा, त्याने तर अशा अत्याचारपीडितांशी सहानुभूतीचा आदेश दिला आहे. आम्ही ईश्वराला मानावयाचे अशासाठी सोडून दिले होते कारण हिंदू धर्मात सांगितले आहे की, मनुष्य जे कर्म करतो ते ईश्वराच्याच आज्ञेने करतो. म्हणून जे अत्याचार गरिबांवर होत आहेत, ते ईश्वराच्याच आज्ञेने होत आहेत. अशा प्रकारे अत्याचार करणाऱ्यांचा कोणताही दोष असत नाही. हे ईश्वरवादी तत्त्वज्ञान आम्हाला पसंत नव्हते. याशिवाय आमचा प्रश्न तत्त्वज्ञानाचा नव्हे, जो आमच्या लोकांवर लाठ्यांचा वर्षाव करतो त्याला तत्त्वज्ञानाचे कुठले ज्ञान? त्याला तर केवळ हेच माहीत आहे की, हे नीच आहेत, यांना मारण्याचा मला अधिकार आहे.

मुस्लिमांकडून दलितांना साहाय्य

दुसरीकडे आम मुस्लिमांनी मानवी आधारावर अस्पृश्य लोकांना सदैव काही ना काही मदत केली आहे. जेव्हा धर्म बदलण्याची गोष्टसुद्धा निघाली नव्हती, तेव्हादेखील मुस्लिमांनी अस्पृश्यांना मदत केली. महाड तलाव आंदोलनात जेव्हा हिंदूनी अस्पृश्यांना निर्दयतेने मारले, तेव्हा अस्पृश्यांनी मुस्लिमांच्या घरातच आश्रय घेतले होते. जेव्हा महाड तलावाचे पाणी पिण्यासाठी दुसऱ्यांदा आंदोलन करण्यासाठी मंडपाकरिता कोणत्याही हिंदूने जागा दिली नाही, तेव्हा मुस्लिमांनीच त्यासाठी जागा दिली होती. (पृष्ठ ७४-७५, जीवन संघर्ष)

बाबासाहेबांनी जेव्हा सिद्धार्थ कॉलेजची स्थापना केली, तेव्हा त्याच्या निर्मितीसाठी मुंबईत एक मुस्लिम सेठ हुसैनजी भाई लालजी यांनी ५० हजार रुपये वर्गणी म्हणून दिले आणि सर कावसजी जहाँगीर यांनीसुद्धा सहयोग दिला. परंतु दु:खाने सांगावे लागते की, गोविंद मालवीय यांनी यावर कठोर टीका केली.

(पृष्ठ १२५, जीवन संघर्ष, लेखक जिज्ञासु)

दुसऱ्या गोलमेज परिषदेत भारताच्या पुढाऱ्यांमध्ये पुष्कळ वादविवाद झाले. अस्पृश्यांच्या मागणीला तुडविण्यासाठी गांधीजींनी गुप्त करार करण्याचा प्रयत्न केला आणि जिनासाहेबांना गांधीजी म्हणाले, ''जर माझ्याशी हातमिळवणी करून तुम्ही अस्पृश्यांच्या मागणीला विरोध केला तर मी तुमच्या सर्व अटी मानण्यास तयार आहे.'' परंतु जिनासाहेबांनी ही गोष्ट मान्य केली नाही आणि सांगितले, ''आम्ही स्वत: अल्पसंख्यक असल्यामुळे विशेषाधिकारांची मागणी करीत आहोत, अशा स्थितीत आम्ही दुसऱ्या अल्पसंख्यकांच्या मागणीला कसा विरोध करू शकू?''

(पृष्ठ १३, पूना पैक्ट गांधीच्या नावे, लेखक शंकरानंद शास्त्री)

हिंदूंनी बाबासाहेबांना विधानपरिषदेत येऊ न देण्याची पूर्ण व्यवस्था करून ठेवली होती आणि सांगितले होते की, ''आम्ही डॉ. आंबेडकरांसाठी विधानपरिषदेत येण्याचे सर्व मार्ग बंद करून टाकले आहेत. जेव्हा बाबासाहेबांनी युरोपियनांची मते मिळवून विधानपरिषदेत प्रवेश करण्याची इच्छा केली, तेव्हा गांधीजींनी अशी आडकाठी आणली की बंगाल विधानसभेच्या युरोपियन सदस्यांना मते देण्याचा अधिकार नाही. तेव्हा बाबासाहेब योगेंद्रनाथ मंडल आणि मुस्लिम लीगच्या मदतीने अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून निवडून विधानपरिषदेत प्रवेश करू शकले.

(पृष्ठ १४१, जीवन संघर्ष, लेखक - जिज्ञासु)

बाबासाहेबांकडून इस्लाम व मुस्लिमांची प्रशंसा

जेथे मुस्लिमांनी दलितवर्गाला पावलोपावली मदत केली आहे, तेथे बाबासाहेबांनी इस्लाम धर्म आणि मुस्लिमांची दिलखुलास प्रशंसा केली आहे. बाबासाहेबांनी जर कोणत्या धर्माला मन:पूर्वक पसंत केले होते तर तो केवळ इस्लाम धर्मच होय. उदाहरण म्हणून त्यांचेच शब्द पुढे उद्धरित केले जात आहेत.

''ख्रिश्चन व इस्लाम धर्मामध्ये जी समानतेची शिकवण दिली गेली आहे, तिचा संबंध विद्या, धनदौलत, चांगला पोषाख आणि शौर्य यासारख्या बाह्य कारणांशी नव्हे, माणसातील माणुसकी सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. ही (माणुसकी) इस्लाम आणि ख्रिश्चन धर्माचा पाया होय आणि ही माणुसकी सर्वांना मान्य असणे आवश्यक आहे. कोणासही असमान मानू नये. ही शिकवण ते (इस्लाम आणि ख्रिश्चन) धर्म देतात.'' (पृष्ठ - २३)

धार्मिक संबंधामुळे तुर्कांचे गठबंधन अरबांशी राहिले. इस्लाम धर्माचा संयोग मानवतेसाठी अत्यंत प्रबळ आहे, ही गोष्ट जगजाहीर आहे. इस्लामी बंधुत्वाच्या दृढतेशी कोणताही अन्य सामाजिक संघ स्पर्धा करू शकत नाही.

(पृष्ठ - २४४, पाकिस्तान अथवा भारताचे विभाजन, लेखक डॉ. आंबेडकर)

मुस्लिम प्रगतीशील आहेत

जेथे हिंदू आपल्या सामाजिक कुरितींच्या चिखलात अडकून पतनाकडे जात आहेत आणि फार रूढिवादी आहेत, तेथे भारताचे मुस्लिम त्या वाईट गोष्टींविरुद्ध आहेत आणि हिंदूंच्या तुलनेत ते अधिक प्रगतिशील आहेत. जे लोक मुस्लिम समाजाला अगदी जवळून जाणतात, त्यांच्यासाठी उक्त प्रभावाचा प्रसार त्यांना आश्चर्यचकित करतो. (पृ.- २५३, पाकिस्तान अथवा भारताचे विभाजन, डॉ. आंबेडकर)

वरील विवेचनावरून स्पष्ट झाले आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इस्लाम धर्माला मोठ्या श्रद्धेने पाहत असत. ते याचा पाया माणुसकी मानत असत. ते इस्लामी संघाला जगात सुदृढ बंधुत्वाचे सर्वश्रेष्ठ प्रतीक आणि प्रगतिशील संघ मानत असत. मग आम्ही आपल्या मूळ समस्येच्या समाधानासाठी उद्देश पूर्ण करण्यात पूर्णपणे सक्षम, सामाजिक गुलामीच्या बेड्या तोडून फेकून देण्यासाठी आणि डॉ. आंबेडकरांचे स्वप्न साकार करण्यासाठी इस्लामसारख्या प्रिय धर्माचा का बरे स्वीकार करू नये, जेणेकरून सुख, शांती आणि समृद्धी प्राप्त करावी आणि आपले परलोकदेखील सुधारावे? चला या, आपणसुद्धा इस्लामच्या शीतल छायेकडे जाऊ या.

राष्ट्रीयतेच्या नावाने हिंदू लोक दलितवर्गाला फसवू शकतील, परंतु मुस्लिमांना मूर्ख बनविणे शक्य नाही!

काही लोक बाबासाहेबांच्या त्या उक्तीला समोर ठेवू इच्छितील ज्यात ते म्हटल्याचे सांगण्यात येते की, ''जर आम्ही ख्रिश्चन अथवा इस्लाम धर्म स्वीकारला तर आमच्या भारतीयतेत फरक पडेल. याद राखा की, धर्म बदलण्याने राष्ट्रीयतेत काहीही फरक पडत नाही. जर असाच विचार त्या देशांनीसुद्धा केला असता जेथील लोक हल्ली बौद्ध धर्म मानतात, तर बौद्ध धर्माचा स्वीकार कोणत्याही अन्य देशवासीयांनी केला नसता. कारण तो त्यांच्या देशात जन्मलेला धर्म नव्हे.'' या स्पष्टीकरणाबरोबरच या प्रसंगी बाबासाहेबांची ही उक्ती अधिक लक्ष देण्याजोगी आहे की, ते (सवर्ण हिंदू) राष्ट्रीयतेच्या नावावर हिंदू निम्नवर्गाला (दलितवर्गाला) फसवू शकतात. परंतु आपले प्रभुत्व टिकविण्यासाठी ते मुस्लिम क्षेत्राच्या मुस्लिम जनतेला मूर्ख बनवू शकत नाहीत. याबरोबरच त्यांनी हेदेखील स्पष्ट केले आहे की, ''लिंकनची ही उक्ती उद्‌बोधक आहे की, सर्वकाळ सर्व लोकांना मूर्ख बनविणे केवळ अशक्य आहे.''

(पृष्ठ ११४-११५, पाकिस्तान अथवा भारताचे विभाजन, लेखक - डॉ. आंबेडकर, जुलै १९७२ आवृत्ती)

काही लोकांचे असे म्हणणे आहे की, इस्लाम विज्ञानाला आपला शत्रू मानतो, परंतु बाबासाहेब याच्या उत्तरादाखल म्हणतात, ''हे खरे वाटत नाही, कारण जर यात सत्यता असती तर जगाच्या इतर मुस्लिम देशांत परिवर्तन, चौकसपणा आणि सामाजिक सुधारणेची क्रांती कशी दिसून आली असती?''

जर या मुस्लिम देशांच्या सामाजिक सुधारणेत इस्लामने कोणतीही अडचण आणली नाही, तर भारतीय मुस्लिमांच्या सुधारवादी मार्गात अडथळा का यावा? भारतात मुस्लिम जातीच्या उक्त गतिहीनतेचे काही विशेष कारण अवश्य आहे. हे विशेष कारण कोणते असू शकेल? माझ्या मते भारतीय मुस्लिमांतील उक्त गतिशून्यतेचे मुख्य कारण त्यांची ती विशिष्ट स्थिती आहे, ज्यात ते जगत आहेत. ते एका अशा सामाजिक वातावरणात जगत आहेत, जो मुख्यत्वेकरून हिंदू आहे आणि जो त्यांच्यावर गुपचूप परंतु दृढतापूर्वक आपला प्रभाव घालीत आहे.

(पृष्ठ - २६७, पाकिस्तान अथवा भारताचे विभाजन, लेखक - डॉ. आंबेडकर)

मुस्लिमांतदेखील जातिवाद आहे काय?

धर्मांतराच्या मार्गात आणखी एक अडथळा निर्माण केला जातो. जातीभेदाने ग्रासले जाऊन धर्मांतर करण्यात काहीही लाभ नाही. अशा तऱ्हेचा युक्तिवाद काही मूर्ख हिंदू लोकच करतात. ते म्हणतात, ''कोठेही जा तेथेही जाती भेद आहेतच. ख्रिश्चनांत जाती भेद आहेत आणि मुस्लिमांतसुद्धा खेदाने ही गोष्ट कबूल करावी लागते की, या देशात अन्य धर्म-समाजांतसुद्धा जातीभेदांनी प्रवेश केला आहे. परंतु या अपराधाचे दोषी हिंदू लोकच आहेत. मुळात हा रोग त्यांनीच उत्पन्न केला आहे. नंतर त्याचा संसर्ग अन्य समाजांनादेखील झाला आहे. ही त्यांच्या दृष्टीने अयोग्य गोष्ट होय. जरी ख्रिश्चन आणि मुस्लिमांमध्ये जाती भेद असले तरी ते हिंदूंमधील जातीभेदासारखेच आहेत, असे म्हणणे म्हणजे चोराला सर्वच चोर दिसतात, या गोष्टीप्रमाणे होईल. हिंदूंमधील जाती भेद व मुस्लिम आणि ख्रिश्चनांतील जातीभेद या दोहोंत फार मोठे अंतर आहे. सर्वप्रथम ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, मुस्लिम आणि ख्रिश्चनांमध्ये जातीभेद असूनदेखील ते त्यांच्या समाजाचे प्रमुख अंग नव्हेत. हिंदूंव्यतिरिक्त दुसऱ्या कोणाला आपण जर विचारले की, तुम्ही कोण आहात तर ते म्हणतील 'मी मुस्लिम आहे अथवा ख्रिश्चन आहे.' एवढेच उत्तर मिळाल्यावर सर्वांचे, अर्थात उत्तर देणाऱ्याचे आणि प्रश्न विचारणाऱ्याचे समाधान होईल. तू कोणत्या जातीचा? असे विचारण्याची अथवा सांगण्याची कोणालाही गरज भासणार नाही. परंतु आपण जर एखाद्या हिंदूला विचारले की, 'तुम्ही कोण आहात?' तर तो उत्तर देतो की, 'मी हिंदू आहे.' तर याने कोणाचेही समाधान होणार नाही. प्रश्न विचारणाऱ्याचेही नाही की उत्तर देणाऱ्याचेही नाही. पुन्हा प्रश्न विचारणे भाग पडते की, 'तुमची जात कोणती?' जोपर्यंत तो आपल्या जातीचे नाव घेत नाही तोपर्यंत कोणासही त्याच्या वास्तविक स्थितीचा पत्ता लागणार नाही. यावरून हे स्पष्ट होते की, हिंदू समाजात जातपातीला किती प्राधान्य दिले गेले आहे आणि ख्रिश्चन व मुस्लिम समाजांत जातीला किती गौण स्थान दिले गेले आहे. (पृष्ठ ४६)

याव्यतिरिक्त हिंदू आणि अन्य समाजांत आणखी एक महत्त्वपूर्ण फरक आहे. हिंदूच्या जाती भेदाच्या मुळाशी स्वत: त्यांचाच हिंदू धर्म आहे. मुस्लिम आणि ख्रिश्चनांच्या जाती भेदांच्या मुळांत त्यांचा धर्म नाही. हिंदू लोकांतील जाती भेद संपविण्याच्या मार्गात त्यांचा धर्म अडथळा बनतो. परंतु ख्रिश्चन आणि मुस्लिम लोकांनी आपले जाती भेद नष्ट करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांचे धर्म यात अडथळे बनत नाहीत, उलट त्यांचे धर्म जाती भेदांना निरुत्साही बनवितात. हिंदूंनी आपला धर्म

नष्ट केल्याशिवाय जाती भेद नष्ट करणे शक्य नाही. मुस्लिम आणि ख्रिश्चनांना जाती नष्ट करण्यासाठी आपले धर्म नष्ट करण्याची काही गरज नाही. जाती नष्ट करण्याच्या कार्यात त्यांचे धर्म अडथळे बनणार नाहीत. जाती भेद सर्वांत व सर्वत्र आहेत, हे मान्य करूनसुद्धा हिंदू धर्मातच राहा, असा निष्कर्ष काढता येणार नाही. जाती भेद जर वाईट गोष्ट असेल तर ज्या समाजात गेल्यास जाती भेदाची तीव्रता, जाती भेदाचा विनाश, लवकर व सहजपणे आणि मुळापासून केला जाऊ शकेल हाच वास्तविक पाहता तर्कसिद्ध सिद्धान्त आहे, हे मान्य करावे लागेल. (पृष्ठ ४६-४७)

जरी वरील विवेचनावरून स्पष्ट झालेले आहे की, मुस्लिमांमध्ये जात-पात केवळ सोयीसाठी आहेत, मत्सर, द्वेष अथवा तिरस्कारासाठी नाही. तरीसुद्धा जर याला दोष म्हणून पाहिले तरी मुस्लिमांमध्ये जाती भेद इतका खोलवर रूजलेला नाही जितका हिंदूंमध्ये रूजलेला आहे. याला कारण म्हणजे इस्लाममध्ये जातीवादाला कोणतेही स्थान नाही, या उलट हिंदूंमध्ये जातिवाद त्यांच्याच धर्माचा अभिन्न भाग आहे.

अत्यंत गांभीर्याने विचार करण्याजोगी गोष्ट अशी आहे की, केवळ जातिवादच आम्हाला त्रस्त करीत आहे का? ही गोष्ट अत्यंत निराधार आहे. केवळ जातिवादाचा कोणाला त्रास होत नाही. जर आमच्या लोकांना चांभार म्हणून संबोधिले असते आणि आम्हाला पूर्ण प्रेम आणि मान दिला असता, तर आम्हाला त्यात कसला त्रास झाला असता? जर केवळ जातिवादामुळेच त्रास होत असेल तर सवर्ण हिंदूंमध्ये निरनिराळ्या जाती आहेत आणि एवढेच नव्हे तर त्यांचे विवाहदेखील आपसांत एका जातीचे दुसऱ्या जातीशी होत नाहीत. असे असूनदेखील हे दाखवा की, ब्राह्मणांचा क्षत्रिय अथवा वैश्यांना कोठे त्रास आहे? अथवा क्षत्रियांकडून ब्राह्मण आणि वैश्य कोठे दु:खी झालेले आहेत? वगैरे या उलट ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य लोक तर सहृदयतेने, प्रेमाने आणि सहयोगाने एकमेकांबरोबर राहतात.

स्वत: आपल्याकडे पाहा. दलितवर्गातसुद्धा अनेक जाती आहेत आणि त्यांच्यातसुद्धा एकदुसऱ्याशी विवाहसंबंध होत नाहीत. असे असूनदेखील असे दाखवा की, भंग्याचा चांभाराला कोठे त्रास आहे? चांभाराला खाटिकाचा कोठे त्रास आहे? रैगरला चांभाराचा अथवा धानक (भिल्लसारखी जात) चा कोठे त्रास आहे? सांगण्याचा मुद्दा असा की फक्त वेगवेगळ्या जाती असल्यामुळे कोणाला त्रास होत नाही. केवळ आपण चांभार जातीलाच पाहा, त्यांच्यासुद्धा अनेक जाती निर्माण झाल्या आहेत आणि येथपावेतो की त्यांच्यात आपापसांत लग्नदेखील होत नाहीत.

कातडी रंगविणाऱ्या चांभाराशी नोकरपेशा अथवा शेती करणारा चांभार कधी विवाहसंबंध जोडत नाही. परंतु जर कातडी रंगविणाऱ्या चांभारावर काही जुलूम झाल्यास नोकरपेशा चांभार व्याकुळ होतो आणि आपल्या सामर्थ्यानुसार मदतीसाठी तयार होतो. अगदी तसेच जर नोकरी अथवा शेती करणाऱ्या चांभारावर काही जुलूम अथवा अत्याचार झाल्यास कातडी रंगविणारा चांभार आणि इतर चांभार फार दु:खी होतात आणि त्याला आपल्यावर झालेला जुलूम आणि अत्याचार मानतात. असे का घडते? याचे कारण असे की, त्यांच्यात आपापसांत तिरस्कार, मत्सर अथवा द्वेष असत नाही. उलट त्याऐवजी प्रेम, आपुलकी आणि सहानुभूती असते.

काहीजण अशाप्रकारची शंका व्यक्त करतात की, धर्मांतरानंतर आमचे अथवा आमच्या मुलांचे विवाह कसे होतील? या संबंधात हे समजून घेतले पाहिजे की, सर्वप्रथम मुस्लिमच लग्नास तयार असतात आणि शेकडो वर्षांपासून मुस्लिम समाजात ही प्रथा रूढ आहे. दुसरे असे की, आम्ही आपपसांतदेखील संबंध जोडू शकतो.

मुस्लिमांत जेव्हा एखाद्या सुतार, भोई अथवा पाणक्याच्या मुलाची वरात सजावटीसह मोठ्या दिमाखाने काढली जाते तेव्हा कोणताही शेख, सय्यद, मोगल अथवा पठाण त्यात अडथळा आणत नाही, पण हिंदूंत जर एखाद्या चांभार अथवा भंग्याच्या मुलाची वरात सजवून दिमाखाने काढली तर त्यात विघ्न आणले जाते, त्यांच्यावर दगडांचा वर्षाव होतो, काही ठिकाणी त्यांना चोप मार दिला जातो आणि काही ठिकाणी तर त्यांना जिवंत जाळले जाते. नवरदेव घोड्यावर बसला होता, म्हणून वरातीत सामील झालेल्या लोकांपैकी चौदा जणांना जिवंत जाळण्यात आले होते. तात्पर्य असे की मुस्लिमांत जातीच्या नावावर तिरस्कार द्वेष अथवा मत्सर आढळत नाही. परंतु हिंदूंमध्ये जातीच्या नावाने आमच्याबद्दल तिरस्कार, द्वेष आणि मत्सर आहे. म्हणूनच आमच्यावर तऱ्हेतऱ्हेचे अत्याचार केले जातात. अत्याचारांची ही मालिका केवळ इस्लामच समाप्त करू शकेल. मुस्लिम बनून व्यर्थची घृणा, द्वेष आणि अत्याचारापासून आपला बचाव करणे शक्य आहे. आमची मूळ समस्या यामुळे कायमची नष्ट होणार आहे.

इस्लामच्या प्रमुख शिकवणी

१. ईश्वर एक आहे. त्याचा कोणीही भागीदार नाही. तो एकटाच आहे. त्याच्याशिवाय इतर कोणीही पूज्य नाही. तो अत्यंत कृपाळू आणि दयावान आहे.

२. ईश्वर आपल्या सेवकांसाठी इतका उदार आहे की, तो त्यांच्या अपराधांना क्षमा करतो या अटीवर की, त्यांनी त्याच्याकडे याचना करावी. गुन्हेगार आणि पापींनी जरी पश्चात्ताप प्रकट करून पवित्र जीवन जगण्याची प्रतिज्ञा केल्यास त्यांच्यावरही ईश्वर दया करतो.

३. ज्या लोकांनी ईश्वराची भीती बाळगली आणि पापभीरूतेचे जीवन जगले त्यांच्यासाठी स्वर्ग आहे. ज्यांनी ईश्वराला नाकारले आणि अवज्ञेचे जीवन जगले त्यांचे निवासस्थान निश्चितपणे नरक आहे.

४. जी व्यक्ती खोटे बोलत नाही, वचन देऊन मोडत नाही, ठेवीचा अपहार करीत नाही, नजर खाली ठेवते, आपल्या गुप्तांगाचे रक्षण करते आणि आपल्या हातांना दुसऱ्यांना दु:ख आणि कष्ट देण्यापासून दूर ठेवते, ती व्यक्ती स्वर्गात जाईल.

५. गर्व करू नका. गर्वच ते पाप आहे ज्याने सर्वप्रथम सैतानाला नष्ट केले.

६. आपापसात फसवणूक, कपट आणि वैर ठेवू नका. कपटीपणा आणि मत्सर बाळगू नका. पाठीमागे कोणाची निंदा करू नका. तुम्ही सर्व आपापसात भाऊ भाऊ आहात.

७. कधीही दारू पिऊ नका.

८. जीवजंतुंना विनाकरण मारू नका.

९. आईवडिलांशी चांगला व्यवहार करा. आईवडिलांच्या प्रसन्नतेत ईश्वराची प्रसन्नता आहे.

१०. मुलाबाळांचे संगोपन चांगल्या प्रकारे करा आणि त्यांना चांगले शिक्षण द्या.

११. कोणताही मनुष्य दुसऱ्या कोणत्याही माणसापेक्षा श्रेष्ठ नाही, तो मनुष्य सर्वश्रेष्ठ आहे ज्याचे कर्म चांगले आहे, मग त्याचा संबंध कोणत्याही देशाशी अथवा पंथाशी असो.

१२. व्याज खाणे आणि व्याजबट्याचा व्यवहार करणे निषिद्ध आहे.

१३. वजनमापात कमी करू नका.

१४. सर्वांशी न्याय करा, मग ते तुमचे संबंधी असोत अथवा शत्रू.

१५. एखाद्याने कोणत्याही माणसाची निष्कारण हत्या केली, तर जणू त्याने सर्व माणसांना ठार मारले. जर कोणी एखाद्या माणसाचा जीव वाचविला, तर जणू त्याने सर्व माणसांना जीवनदान दिले.

१६. स्वच्छता धर्मावरील अर्धा विश्वास आहे.

१७. ज्याचा शेजारी उपाशी असेल आणि तो स्वत: पोटभर भोजन करील तो मनुष्य मुस्लिम नव्हे.

१८. मृत्यूनंतर सर्व माणसांना ईश्वरापुढे हजर व्हावयाचे आहे आणि आपल्या कर्मांचा हिशेब द्यावयाचा आहे. हे जग तर परीक्षाभवन आहे.

१९. ईश्वर लोकांच्या मार्गदर्शनासाठी आपले पैगंबर पाठवीत असतो आणि शेवटी पैगंबर मुहम्मद (स.) यांना आपला अंतिम पैगंबर बनवून पाठविले. जगाचा शेवट होईपर्यंत संपूर्ण मानवजातीसाठी हे बंधनकारक आहे की, त्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अनुकरण करावे.

२०. पवित्र कुरआन अल्लाहने पाठविलेला ग्रंथ आहे, जो पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यामार्फत संपूर्ण मानवजातीच्या मार्गदर्शनासाठी पाठविला गेला आहे. यात संपूर्ण जीवनासाठी आवश्यक मार्गदर्शन केले गेले आहे.

२१. जाती, रंग, भाषा, क्षेत्र, राष्ट्र, राष्ट्रीयतेच्या आधारावर कोणाशीही उच्च-नीच, शिवाशिव, भेदभाव आणि पक्षपाताचा व्यवहार करू नका.

२२. चुकीच्या पद्धतीने दुसऱ्याचा माल खाऊ नका. वैध कमाई करा.

-०- समाप्त -०-